# प्रेसनोट

दि. ३१/०१/२०२५

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून सेतू कार्यालय, अप्पर तहसिल कार्यालय, हवेली, पुणे येथील दोन महिला संगणक ऑपरेटर यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४८ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. वंदना दिनेश शिंदे, वय ५० वर्ष, पद - ऑपरेटर (इ.लो.से)<br>२) श्रीमती जयश्री रोहिदास पवार, वय ४५ वर्ष, पद - ऑपरेटर (इ.लो.से)<br>दोघी नेमणूक - सेतू कार्यालय, अप्पर तहसिल कार्यालय हवेली, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/- (पाचशे) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४००/- (चारशे) रुपये |
| पडताळणी दिनांक | ३१/०१/२०२५ |
| सापळा दिनांक | ३१/०१/२०२५ रोजी |
| ठिकाण | सेतू कार्यालय, अप्पर तहसिल कार्यालय हवेली, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. श्रीराम शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र.८८८८३६१०००) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी भुमिहीन असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी रितसर अर्ज अपर तहसिल कार्यालय हवेली, पुणे येथ अर्ज सादर केला होता. त्यानुसार तक्रारदार यांचा भुमिहीन असल्याबाबतचा दाखला देण्यासाठी सेतू कार्यालय, अप्पर तहसिल कार्यालय हवेली, पुणे येथील इतर लोकसेवक श्रीमती वंदना शिंदे यांनी ५००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, इतर लोकसेवक श्रीमती वंदना शिंदे, संगणक ऑपरेटर यांनी तक्रारदार यांना भुमिहीन असल्याबाबतचा दाखला देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे शासकीय फी ३४/- रुपये व्यतिरिक्त ४००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन, इ.लो.से. श्रीमती वंदना शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडून ४००/- (चारशे) रुपये पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच इतर लोकसेवक क्र. २ श्रीमती. जयश्री पवार, संगणक ऑपरेटर यांनी सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने, त्या दोघींविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

३१/१/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक
सत्यमेव जयते
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner